महाराष्ट्र शासन

क्रमांक : एसएचसी-२००८/(१०५/०८)/उमाशि-२
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २८ मे,२००८

प्रति,
सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे.

विषय : माध्यमिक शालांत प्रमाणपत्र व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा परीक्षा सुधार कार्यक्रमात श्रेणी सुधारणा (Class Improvement) करण्याची संधी देण्याबाबत.

संदर्भ : आपले पत्र क्र. रामं/परीक्षा-८/२५४०, दिनांक २.४.२००८.

वरील विषयासंबंधी आपल्या संदर्भाधिन पत्रान्वये शासनास सादर केलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा सुधार कार्यक्रमात श्रेणी सुधारणा (Class Improvement) करण्याची संधी देण्याबाबतच्या प्रस्तावास याद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे. तरी याबाबतची कार्यवाही आपल्या स्तरावरुन तात्काळ करुन केलेल्या कार्यवाहीबाबतचा अनुपालन अहवाल शासनास सादर करावा.

( सं. पु. खोरगडे )
अवर सचिव,महाराष्ट्र शासन.

प्रत, माहितीसाठी अग्रेषित :-
मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव,
मा.सचिव (शालेय शिक्षण व क्रीडा) यांचे स्वीय सहाय्यक,
निवड नस्ती, उमाशि-२.

I:\SMD\LETTERS\HSC 2108

(33) ③

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, शिवाजीनगर, पुणे-४११ ००५**

**परिपत्रक:- क्र.रा.मं/परीक्षा-८/ दिनांक ४/६/२००८**

४२१८ ५

**विषय:-** उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा
श्रेणी सुधार योजना(Class Improvement Scheme)

राज्यातील सर्व कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांना कळविण्यात येते की, सद्:स्थितीत मंडळ नियमावलीतील तरतुदीप्रमाणे इयत्ता १२ वीच्या परीक्षेमध्ये विद्यार्थी उत्तीर्ण झाल्यास त्याला पुन्हा तेच विषय घेऊन परीक्षेला प्रविष्ट होता येणार नाही अशी नियमावलीमध्ये तरतूद आहे. मात्र एकदा उत्तीर्ण झालेला विद्यार्थी त्याने घेतलेल्या विषयांव्यतिरिक्त अन्य विषय घेऊन (तुरळक विषय,आयसोलेटेड सब्जेक्ट्स) परीक्षेला प्रविष्ट होऊ शकतो.

विद्यार्थ्याच्या वर्षभराच्या कामगिरीचे मूल्यमापन दोन किंवा तीन तासांच्या परीक्षेमध्ये वर्षाअखेरीस करणे योग्य ठरणार नाही, ज्या विद्यार्थ्यांना कमी गुण मिळतात ते उत्तीर्ण झालेले असले तरी त्यांच्या भवितव्यावर त्याचा परिणाम होण्याची शक्यता असते. सबब उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनाही त्यांच्या श्रेणी सुधारण्यासाठी पुन्हा परीक्षेस बसण्याची संधी देण्याबाबत विविध स्तरांवरून मागणी होत होती. मंडळानेही या संदर्भात बराच विचारविनिमय केला असून श्रेणी सुधार योजना मंडळाला लागू करण्याबाबत निर्णय घेतला आहे. याबाबत शासनाने शासनाच्या क्र.एसएचसी/२००८/(१०७/०८) उमाशि-२ दिनांक २८ मे २००८ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार श्रेणीसुधार योजनेची अंमलबजावणीची कार्यपध्दती खालीलप्रमाणे राहील.

(१) ही योजना पुनर्रचित अभ्यासक्रमानुसार प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांना लागू राहील.

(२) एकाच वेळी सर्व विषय घेऊन उत्तीर्ण झालेला विद्यार्थीच या योजनेखाली अर्ज करू शकेल. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्याने स्वतंत्र आवेदनपत्र भरणे आवश्यक राहील.

(३) एकाच वेळेस श्रेणी सुधार आणि आयसोलेटेड म्हणून बसता येणार नाही.

(४) विद्यार्थ्याला त्याने उत्तीर्ण केलेले सर्व विषय घेणे बंधनकारक राहील. नव्याने कोणताही/कोणतेही विषय घेता येणार नाहीत अथवा वगळता येणार नाही.

(५) विद्यार्थ्याने उत्तीर्ण केलेल्या परीक्षेनंतरची लगेच लगतच्या परीक्षेसाठीच ही संधी फक्त एकदा उपलब्ध राहील. उदा.मार्चमध्ये उत्तीर्ण झालेला विद्यार्थी लगतच्या ऑक्टोबरच्या परीक्षेस या योजनेखाली प्रविष्ट होऊ शकेल.

(६) ही संधी एकदाच अनुज्ञेय राहील.

(७) ही संधी फक्त लेखी परीक्षेसाठीच अनुज्ञेय राहील. विद्यार्थ्याला आधीच्या परीक्षेतील तोंडी परीक्षा, प्रात्यक्षिक परीक्षा, अंतर्गत मूल्यमापन, शालेय श्रेणीच्या विषयांमध्ये मिळालेले गुण/श्रेणी या योजनेखाली होणाऱ्या परीक्षेसाठी गृहीत धरले जातील. (carry forword)

(८) या योजनेखाली प्रविष्ट होताना विद्यार्थ्याला विषय/शाखा,माध्यम,केंद्र, विभाग बदल अनुज्ञेय असणार नाही.

(९) विद्यार्थी ज्या कनिष्ठ महाविद्यालयातून आधीच्या परीक्षेला प्रविष्ट झाला असेल त्याच कनिष्ठ महाविद्यालयातून त्याने आवेदनपत्र सादर करणे आवश्यक राहील व सदर कनिष्ठ महाविद्यालय परीक्षेसाठी ज्या परीक्षा केंद्राच्या कार्यकक्षेत आहे तेच परीक्षा केंद्र त्याला मिळेल.

(१०) या विद्यार्थ्याचा निकाल सदर परीक्षेच्या इतर विद्यार्थ्यांच्या निकालाबरोबर जाहीर केला जाईल. मात्र या विद्यार्थ्यांना गुणपत्रिका निकालाच्या दिवशी मिळणार नाही.

(११) निकाल जाहीर झाल्यानंतर या विद्यार्थ्यांना या योजनेखाली प्रविष्ट झालेल्या परीक्षेची गुणपत्रिका स्वीकारावयाचा विकल्प (विकल्प फॉर्मच्या नमुन्यात) देण्याचा अधिकार असेल. विद्यार्थ्याला संपूर्ण नवीन किंवा संपूर्ण पूर्वीच्या परीक्षेची गुणपत्रिका स्वीकारणे बंधनकारक राहील. काही विषयांचे गुण जुन्या परीक्षेचे व काही विषयांचे गुण नवीन परीक्षेचे अशी सरमिसळ अनुज्ञेय राहणार नाही. हा विकल्प विद्यार्थ्याने निकाल जाहीर झाल्यानंतर संबंधित कनिष्ठ महाविद्यालयामार्फत ७ दिवसाच्या आत विभागीय मंडळाकडे सादर करणे आवश्यक राहील.

Mahendra G.140

विद्यार्थ्यांने विकल्प न दिल्यास पुर्वीची गुणपत्रिका त्यांना स्वीकारार्ह आहे असे गृहित धरून नवीन परीक्षेची संपादणूक रद्द ठरविली जाईल

(१२) विद्यार्थ्यांने या योजनेखाली प्रविष्ट झालेल्या परीक्षेची गुणपत्रिका स्वीकारण्याचा निर्णय घेतल्यास त्याला यापूर्वी उत्तीर्ण झालेल्या परीक्षेची मूळ गुणपत्रिका मंडळाकडे विकल्पासोबत जमा करणे आवश्यक राहील.व सदर गुणपत्रिका रद्द करण्यात येईल. त्यानंतरच त्याला सदर योजनेखाली प्रविष्ट परीक्षेची गुणपत्रिका देण्यात येईल.

(१३) सदरहू योजनेखाली प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांना नवीन गुणपत्रिका स्वीकारण्याचे ठरवल्यास त्या गुणपत्रिकेवर 'श्रेणी सुधार योजनेअंतर्गत' (अंडर क्लास इम्प्रुव्हमेंट स्कीम)असा उल्लेख असेल.

(१४) या योजनेअंतर्गत प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी परीक्षा शुल्क नियमित/पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या निर्धारित शुल्काच्या दुप्पट शुल्क आकारले जाईल एकदा भरलेले शुल्क परत दिले जाणार नाही.

(१५) जे उत्तीर्ण विद्यार्थी या योजनेनुसार ऑक्टोबर २००८ मध्ये होणाऱ्या परीक्षेस पुन्हा प्रविष्ट होवू इच्छितात त्यांनी संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाकडे दिनांक १७ जून २००८ पर्यंत अर्ज करावा कनिष्ठ महाविद्यालयाने दिनांक २१ जून २००८ पर्यंत विभागीय मंडळाकडे मागणी नोंदवावी त्यानुसार कनिष्ठ महाविद्यालयांना आवेदनपत्रे उपलब्ध करून दिले जातील.विहित शुल्कासह आवेदनपत्रे विद्यार्थ्यांनी ३० जून २००८ पर्यंत कनिष्ठ महाविद्यालयाकडे सादर करावीत.

(१६) विद्यार्थ्यांने गुणपडताळणीसाठी अर्ज केला असेल व गुणपडताळणीच्या निकालामुळे विद्यार्थ्याचे समाधान झाले असल्यास श्रेणीसुधार योजनेअंतर्गत परीक्षेस प्रविष्ट व्हायचे किंवा नाही हा निर्णय पूर्णत: त्या विद्यार्थ्याचा असेल.

(१७) या योजनेअंतर्गत परीक्षेस प्रविष्ट होणारा विद्यार्थी पारितोषिकासाठी तसेच क्रीडा गुण सवलतीसाठी पात्र असणार नाही.

(१८) अपंग विद्यार्थ्यांना असलेल्या सवलती अनुज्ञेय राहतील.

आदेशान्वये

सचिव,
(अतिरिक्त कार्यभार)
राज्य मंडळ, पुणे -०५

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर विभागीय मंडळ,
पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर यांना कळविण्यात येते की, उपरोक्त परिपत्रक, आपल्या कक्षेतील सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांना त्वरित पाठविण्याची व्यवस्था करावी.

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी:-

(१) विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व विभाग
(२) सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद
त्यांनी वरील परिपत्रक सर्व संबंधितांच्या तात्काळ निदर्शनास आणून द्यावे.

प्रत माहितीसाठी सादर:-

(१) मा. सचिव, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय विस्तारभवन, मुंबई -३२
(२) मा. शिक्षण संचालक,(माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य शिक्षण संचालनालय,
मध्यवर्ती इमारत, पुणे -४११ ००१

Maharashtra State
Board of Secandary & Higher Secendry Education
S.R. No. 832 A, Fainal Plat No. 178, 189,
Bhamburda, Shivajinagar, Pune- 411 004.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व्हे नंबर-८३२ अे,फायनल प्लॉट नं.१७८,१८९
भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००४.

Phone No.:- 020- 25705000, Telegram:- MAHABOSEC,PUNE. Fax No.:02025665807.

(519)

जा.क्र.रा.मं./परीक्षा-८/१५७०५ दिनांक-२२/०२/२०१२.

प्रति,

**विभागीय सचिव,**
**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व**
**उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**नागपूर विभागीय मंडळ.**

**विषय - श्रेणी सुधार अंतर्गत प्रविष्ठ विद्यार्थ्यांच्या सुधारित गुणपत्रिकेबाबत.**

**संदर्भ -** आपले क्र.नाविमं/पउमा/३२६३, दि.२१/०१/२०१२ चे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या संदर्भात कळविण्यात येते की, आपणांकडून प्राप्त झालेले उपरोक्त संदर्भिय पत्र दि. १५/०२/२०१२ च्या कार्यकारी परिषदेसमोर विचारार्थ ठेवण्यात आले असता खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला आहे.

## ठराव :-

सप्टें/ऑक्टो २०११ मध्ये संपन्न झालेल्या इ. १२ वी च्या परीक्षेस श्रेणी सुधार योजनेअंतर्गत प्रविष्ठ होऊन उत्तीर्ण झालेली विद्यार्थीनी कु. भस्मे दिक्षा पुरुषोत्तम हिने आजारपणाच्या कारणास्तव गुणपत्रिका प्राप्त करुन घेण्यास उशीर झाल्याच्या कळविलेल्या पत्रावर सभेत सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेअंती सदर विद्यार्थीनीची विनंती मान्य करण्यात आली.

परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर गुणपत्रिका वितरीत केल्याच्या दिनांकापासून एक महिन्यापर्यंत विकल्प देऊन सुधारित गुणपत्रिका बदलून देण्याच्या कालावधीत कोणताही बदल करण्यात येऊ नये. मात्र एक महिन्यापेक्षा अधिक कालावधीच्या, विभागीय मंडळांकडून प्राप्त होणा-या अशा प्रकारणांत, प्रकरणाच्या गुणवत्तेनुसार निर्णय घेण्याचे अधिकार राज्यमंडळाच्या परीक्षा समितीला देण्यात यावेत असे ठरले."

तरी उपरोक्त ठरावाची नोंद घेवून यापुढे विभागीय मंडळानी कार्यवाही करावी.

सचिव,
राज्यमंडळ, पुणे ४.

प्रत माहितीस्तव -

१. **विभागीय सचिव, सर्व विभागीय मंडळे.**
२. **व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्यमंडळ, पुणे ४.**